
# सामाजिक संपर्कातून सुवार्ताप्रसार

## येशूला तुमच्या मित्रांकडे घेऊन जा

मुलांना शिकवणाऱ्यांनी W1b हा अभ्यास वाचावा.


**1. तुमच्या मंडळीला, त्यांचे मित्र व नातेवाईकांना ख्रिस्ताची साक्ष देण्यास मदत करता यावी यासाठी देवाच्या वचनातून आपल्या अंत:करणाची व मनाची तयारी करा.**

''प्रिय, पवित्र आत्म्या, आमच्या पुनरुस्थित तारकाला, येशू ख्रिस्ताला आम्हांला आमच्या मित्रमंडळींपर्यन्त होऊन जाता यावे याकरीता कृपा करुन तुझे सामर्थ्य आम्हांला दे.''



**पाहा** प्रे.कृ. अध्याय 10 मध्ये आणखी एका शहरात व संस्कृतीत नवी मंडळी जन्माला यावी, यासाठी काय घडले.

- या प्रसंगासाठी देवाने लोकांना तयार करण्यास सुरुवात केली तेव्हा पेत्र व कर्नेल्य काय करीत होते?



- कर्नेल्य प्रार्थना करीत असताना देवदूताने त्याला काय करण्यास सांगितले?
- कर्नेल्याने पाठवलेले सैनिक यापोस येण्यापूर्वीच, देवाने, परराष्ट्रीयांच्या घरी जाऊन त्यांचे मनाई केलेले जेवण जेवण्यासाठी पेत्राची तयारी केली. पेत्राला त्याच्या स्वप्नात धक्कादायक असे काय पहायला मिळाले?
- देवाने पेत्राला स्वप्नात अशुद्ध प्राणी खाण्यास सांगितले, त्यानंतर आपण सर्व वंशाच्या लोकांचा आदर केला पाहिजे हे पेत्राला समजले. कैसरीया येथील कर्नेल्याच्या घरी पेत्राबरोबर कोण गेले?

पेत्र आणि त्याचे सहकारी कैसरीया येथे आल्यावर कर्नेल्याच्या घरी कोण वाट पाहात असल्याचे त्यांना दिसले?

- कर्नेल्याचे जवळचे मित्र आणि कुटुंबियांना पेत्राने येशूविषयी कोणती शेवटची गोष्ट सांगितली?
- पेत्र येशूच्या जीवन देणाऱ्या पुनरुत्थानाची घोषणा करीत असताना ऐकणाऱ्यांवर पवित्र आत्मा आला. त्यांचा विश्वास व पश्चात्ताप याविषयी पेत्र व त्याच्या सहकाऱ्यांनी कशा प्रकारे खात्री करुन घेतली?




- नवीन विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा झाल्यावर पेत्र किती काळ तिथे थांबला?
- पेत्र आणि त्याचे सहकारी नवीन विश्वासणाऱ्यांना ख्रिस्तामधील त्यांच्या

आज्ञापालनात स्थिर करण्यासाठी तिथे 'काही दिवस राहिले' पेत्राने काही महागाच्या साधानांचा उपयोग केला का? सर्वसामान्य लोकांना अनुकरण करता येणार नाही अशा प्रकारची कौशल्ये वापरुन त्याने साक्ष दिली का?

- बाजूच्या चित्रात कोणती चूक आहे?

(उत्तर : चित्रामधील सुवार्तिक नवीन विश्वासणूायांना अनुकरण करता येईल अशा पद्धतीने ख्रिस्ता विषयी सांगण्यात अपयशी ठरला आहे. त्याने एकेका व्यक्तिपर्यत संदेश जाऊ दिला नाही. पेत्रासारखे सुवार्तिक सर्व विश्वासणूायांना उपयोगात आणता येईल अशा पद्धतीने सुवार्ता सांगतात तेव्हा ती अनेक लोकांपर्यन्त पोचते. काही विशेष प्रसंगी चांगले संगीत वाजवणे. लोकांना येशूविषयी ऐकण्यास आकर्षित करणे यासाठी संगीत ठिक आहे. तथापि, संगीत ही काही सुवार्ताप्रसारासाठीच मुख्य पद्धत होऊ शकत नाही).

**2. आगामी आठवडयात करावयाच्या गोष्टींची सहकाूयांशी चर्चा करा.**

- विश्वसणूायांनी त्यांचे मित्र व नातेवाईकांची भेट घेऊन त्यांना ख्रिस्ताविषयी सांगावे यासाठी योजना आखा.
- प्रत्येकाला अगदी सहजपणे साक्ष देता यावी यासाठी सोपी पद्धत वापरण्यासाठी देवाकडे साहाय्य मागा.
- येशूविषयी अद्याप न ऐकलेल्या लोकांकडे सेवकांना पाठवण्याची योजना आखा. त्यांना कर्नेल्या सारख्या लोकांचा, म्हणजे ज्यांना देवाने सुवार्ता ऐकण्यास आणि त्यांच्या मित्रमंडळीला सांगण्यास तयार केले आहे, शोध घ्या.

**3. आगामी उपासने विषयी सहकाूयांशी चर्चा करुन योजना आखा.**

प्रसंग आणि स्थानिक रितीरिवाज यानुसार कार्यक्रम निवडा. उदाहरणार्थ :

प्रे.कृ. अध्याय 10 मधून पेत्र व कर्नेल्याचा कथावृत्तांत्त सांगा किंवा नाट्यीकरण करा.


भाग 1 मध्ये तुम्हांला आढळलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारा. प्रे.कृ. 10 मध्ये तुम्हांला आढळलेल्या सत्यांविषयी चर्चा करण्यास विश्वासणूायांना मदत करा. या विषयी बोला:

- सुवार्ताप्रसाराची सुरुवात प्रार्थनेने होते.
- सुवार्ता ऐकणारा आणि सांगणारा अशा दोघांचीही देव तयारी करुन घेतो, म्हणजे दोघांनाही पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने संपर्क साधून बोलता येते.
- दोन वा तीन ख्रिस्ती लोकांनी एकत्रित काम करावे. येशू आणि त्याच्या शिष्यांनी कधीही एकेकटयाने प्रवास केला नाही.
- कुटुंबातील सदस्य आणि जवळचे मित्र ह्या वर्तृळात सुवार्ता अगदी सहजपणे पसरली जाते.
- सुवार्तेचा ओघ सहजपणे वाहण्यासाठी, नवीन विश्वासणूायांना चट्कन आत्मसात करता येतील अशा पद्धती वापरा. उदाहरणार्थ, पेत्राने फक्त येशू, त्याचे यज्ञार्पणाचे मरण आणि जीवन देणारे पुनरुत्थान याविषयी सांगितले. आणि हे काणालाही करता-सांगता येईल.
- नवीन विश्वासणूायांचा विश्वास व पश्चात्तापाची बाप्तिस्म्याने खात्री करुन घ्या.
- काही काळ नव्या विश्वासणूायांबरोबर राहून त्यांना येशूचे आज्ञापालन करण्यास शिकवा, त्यांच्या नव्या विश्वा सात त्यांना दृढ करा. त्या समाजात अद्याप मंडळी नसेल तर ती सुरू करा.

ख्रिस्तामधील नवीन जीवनाचा अद्याप शोध न लागलेल्या मित्र व नातेवाईकांसाठी त्यांची **नावे घेऊन प्रार्थना करा.**

नुकताच ख्रिस्तावर विश्वास ठेवलेले किंवा आरोग्य मिळालेल्यांसाठी **देवाची स्तुति करा**

**पाठ करा** प्रे.कृ. 16:31



मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम मंडळीसमोर सादर करण्यास सांगा. त्यांनी तयार केलेले प्रश्न मोठया माणसांना विचारावेत.

आठवडयामध्ये तुम्ही ठरवलेल्या सुवार्ताप्रसार कार्यक्रमाची घोषणा करा. ख्रिस्ताची साक्ष कोणाला व कधी द्यायची हे विश्वासणूायांना ठरवू द्या.

विश्वासणूायांना दोन किंवा तीन जणांचा गट करायला सांगा. त्यांनी त्यांच्या योजनांसाठी थोडावेळ प्रार्थना करायची आहे.

प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी, देवाने पेत्राला यहूदीतर लोकां बरोबर कसे जेवायला सांगितले ते स्पष्ट करा आणि स्वर्गात ख्रिस्ताच्या गौरवी विवाहाच्या मेजवानीत सर्व वंशाचे लोक सहभागी होतील, हे ही सांगा. प्रभुभोजन हा त्या मेजवानीचा नमुना आहे. त्या मेजवानीचा प्रमुख मानकरी स्वत:ख्रिस्त असणार आहे आणि आपण त्याला समोरा समोर प्रत्यक्ष पाहणार आहोत.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net